# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १५/०८/२०१८**

## १)घरफोडी :-

**अ)शिवाजीनगर :-** दिनांक १३.०८.२०१८ चे ०९.०० वा. ते २१.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरी लोणे यांचा वाडा आश्रुफनगर नांदेड येथे, यातील अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे दरवाजाची कडी वाकवुन घरात प्रवेश करुन घरातील कपाटातील सोन्या चांदीचे दागीने व नगदी रुपये असा एकुण १८,२००/-रुपयाचा माल चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी मंगलबाई भ्र. शिवाजी नांगरे, वय ३९ वर्षे व्यवसाय मजुरी रा. लोणे यांचा वाडा आश्रुफनगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरनं १९३/२०१८ कलम ४५४, ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/ २१५५जमदाडे, मो.क्र. ९२८४४०१८००** हे करीत आहेत.

**ब)विमानतळ :-** दिनांक १३.०८.२०१८ चे २३.३० वा. चे सुमारास, फिर्यादीचे किराणा दुकानात गोविंदनगर, नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे किराणा दुकानाचे शटरचे कुलूप तोडुन आत प्रवेश करुन दुकानातील ब्रीस्टॉल पॉकेट व गल्यातील नगदी चिल्लर पैसे चोरण्याचा प्रयत्न करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी अरुण पि. चंदन सिनगारे, वय ३५ वर्षे व्यवसाय किराणा दुकान रा. गोविंदनगर नांदड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरनं १९७/२०१८ कलम ४६१, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १७२४ पांचाळ, मो.क्र. ०२४६२-२२११००** हे करीत आहेत.

## २)मो. सा.चोरी :-

**अ) माहुर :-** दिनांक १२.०८.२०१८ चे ०९.०० ते ०९.३० वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरा समोरुन माहुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादीची हिरो होंडा स्पेलंडर कंपनीची मो. सा. क्रंमांक एम.एच.२९/९०६८ अंदाजे किंमत १५,०००/- रुपयाची आज्ञात चोरटयाने हॅण्डल लॉक तोडुन चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शिवशंकर साहेबराव थोटे, वय ३२ वर्षे रा. माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. माहुर** गुरनं १०१/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/७९ राठोड, मो.क्र. ९९२१२३५५७९** हे करीत आहेत.

**ब) इतवारा :-** दिनांक ११.०८.२०१८ चे १०.०० वा. चे सुमारास फिर्यादीचे घरा समोरुन सिध्दनाथपुरी नांदेड येथे, यातील फिर्यादीची मो. सा. क्रंमांक एम.एच.२६/ए. व्ही. ३२१७ अंदाजे किंमत २०,०००/- रुपयाची आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अब्दुल खलील मोमीन पि. अब्दुल खयुम, वय ४४ वर्षे व्यवसाय मिस्त्री रा. नविमजिद, सिधनाथपुरी नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरनं २५५/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१२४ गवळी, मो.क्र. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ३)विवाहितेचा छळ :-

**बिलोली :-** दि. ११.०५.२०१३ पासुन ते आज पावेतो बाबुळगा ता. बिलोली जि. नांदेड येथे, यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादी बाईस सौदीला जाण्यासाठी माहेरकडुन ५०,००० रुपये हुंडा घेवुन ये, नाही आणलीस तर तु घरा मध्ये येऊ नकोस असे म्हणुन थापडा बुक्याने पोटात, व दोन्ही पायावर मारहाण केली. इतर आरोपीतानी शिवीगाळ करुन घराचे बाहेर काढुन थापडा बुक्याने तोंडावर, पाठीत मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. व तिचा शारिरीक व मानसिक छळ केला. वगैरे **२३ वर्षीय वय असलेल्या महिला फिर्यादीने** दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. बिलोली** गुरनं. २२०/२०१८ कलम ४९८(अ), ३२३, ५०४, ५०६, ३४ भादविप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/३९१ बोधने, मो.क्र. ०२४६५-२२३३३३** हे करीत आहेत.

## ४)आत्महत्येस प्रवृत करणे :-

**कुंटूर :-** दिनांक ०९.०८.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास फिर्यादीचे सासर घरी रा. पाटोदा ता. नायगाव, जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे शिवकांताबाई संभाजी हंबर्डे, वय २० वर्षे व्यवसाय घरकाम रा. पाटोदा ता. नायगाव जि. नांदेड** हीस यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन, तु घरी राहुन चांगले करुन खातेस असे म्हणुन दोन दिवसा पासुन उपाशी ठेवुन तिचा शारीरीक व माणसीक छेळ केल्याने आरोपीचे त्रासास कंठाळुन अंगावर रॉकेल टाकुन जाळुन घेतले. तिस उपचार कामी आधार हॉस्पीटल दाखल केले असता उपचारा दरम्यान दि. १४.०८.२०१८ रोजी चे ०३.३० वा. मरण पावली. तिचे आत्महत्येस आरोपी हे कारणीभुत झाले. वगैरे **खबर देणार शिवकांताबाई संभाजी हंबर्डे, वय २० वर्षे व्यवसाय घरकाम रा. पाटोदा ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या मृत्यु पुर्व जबाबावरुन **पो.स्टे. कुंटूर** गु.र.नं. **१२८/२०१८** कलम ३०६, ३४, भादवि प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/मरे, मो.क्र. ९५२७७३२१००** हे करीत आहेत.

## ५) झन्ना मन्ना नावाचा जुगार :-

**मुक्रामाबाद :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १९.५० वा. चे सुमारास आडत लाईन येथे, मुंडकर यांचे हॉटेल समोर सार्वजनिक ठिकाणी, मुक्रामाबाद ता. मुखेड जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या झन्ना मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह १२,१२० /- रुपयाचे मालासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी सपोनि/ सुनिल चंद्रकांतराव नाईक, ने.पो. स्टे. मुक्रामाबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुक्रामाबाद** गुरन. १५५/२०१८ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२१९१ चिंतोरे, मो.नं. ९५५२५०१८५७** हे करीत आहेत.

## ६) बेकायदेशिररीत्या देशी दारू बाळगुन मिळुन आला :-

**अ)भाग्यनगर :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १८.१० वा. चे सुमारास, गजानन बाबा पेट्रोल पंपासमोर, नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु १८० एम.एल.४८ शिलबंद बॉटल किंमती २,४९६/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी सपोनि/ रेवनाथ कोंडीबा डमाळे, ने. पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन २५२/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२०९ मंगनाळे, मो.क्र. ०२४६२-२६१३६४** हे करीत आहेत.

**ब)भाग्यनगर :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १६.४५ वा. चे सुमारास, बारचे पाटीमागे कॅनोल रोड, नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु १८० एम.एल.४८ शिलबंद बॉटल किंमती २,४९६/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोनि/ अनिरुध्द सोपानराव काकडे, ने. पो. स्टे. भाग्यनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरन २५०/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२२५९ श्रीरामे, मो.क्र. ९४२१७६१६५२** हे करीत आहेत.

**क) धर्माबाद :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे २१.४० वा. चे सुमारास, साईबाबा मंदीर समोरील सार्वजनिक रोडवर, नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु १८० एम.एल. ९३ शिलबंद बॉटल किंमती ४,८३६/- रुपयाचा माल व एक टीव्हीएस मो. सा. ए.पी.-२५/एच. ३२५७ कि. अ. १५,०००/-रुपयाची असा एकुण १९,८३६/-रुपयाचा चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने वाहातुक करीत असताना स्वतःच्या ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/२३७५ भाऊराव माणिकराव पावडे, ने. पो. स्टे. धर्माबाद** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. धर्माबाद** गुरन १८६/२०१८ कलम ६५ (ई), ८३ महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१९२१ कदम , मो.क्र. ०२४६५-२४४१३३** हे करीत आहेत.

**ड) इतवारा :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १६.२० वा. चे सुमारास, मच्छी मार्केट जवळ इतवारा, नांदेड येथे, यातील नमुद आरोपी बिना परवाना बेकायदेशिर रित्या देशी दारु १८० एम.एल. ४८ शिलबंद बॉटल किंमती २,४९६/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/२४३४ प्रमोद पि. गोंविदराव कऱ्हाळे , ने. पो. स्टे. इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरन २५६/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/२४३४ कऱ्हाळे, मो.क्र. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ७) बेकायदेशिररीत्या विदेशी दारू बाळगुन मिळुन आला :-

**अ) हिमायतनगर :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १५.३० वा. चे सुमारास मौजे वासीगाव हनुमानमंदीरा जवळ ता. हिमायतनगर नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिर रित्या विदेशी दारु किंमती ७,२००/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने मो. सा. क्रमांक एम. एच. -२६/१५३३ किंमती अंदाजे ४०,०००/-रु ची असा एकुण ४७,२००/-रु चा माल पोत्यामध्ये विदेशी दारुच्या बॉटल घेवुन वाहातुक करीत असताना स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोना/१९६९ हेमंत रामराव चोले, ने. पो. स्टे. हिमायतनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. हिमायतनगर** गुरन ११९/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/बनसोडे, मो.क्र. ७०३८३६६९९९** हे करीत आहेत.

**ब) शिवाजीनगर :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १२.३० वा. चे सुमारास एम. एफ. होण्डा शोरुमचे बाजुस साठेचौक ते महाराना प्रताप चौकाकडे जाणारे सार्वजनिक रोडवर मगनपुरा, नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिर रित्या विदेशी दारु किंमती २,२६०/-रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःच्या ताब्यात बाळगलेला मिळुन आला, वगैरे **फिर्यादी पोना/२२८२ शेख ईब्राहीम शेख ईस्माईल, ने. पो. स्टे. शिवाजीनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरन १९२/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१३०२ गिरी, मो.क्र. ९३२५४४७०८६** हे करीत आहेत.

## ८) बेकायदेशिररीत्या गावठी दारु घाळण्याचे मोहफुल रसायण बाळगुन मिळुन आला :-

**मांडवी :-** दिनांक १४.०८.२०१८ रोजी चे १८.२० वा. चे सुमारास आरोपीचे घरी निराळा तांडा, ता. किनवट जि.नांदेड येथे, यातील नमुद आरोपीने विनापरवाना बेकायदेशिररित्या २,०० लीटर मोहफुल रसायण किंमती २०,०००/-रुपयाचा माल गावठी हातभट्टी दारु गाळुण चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/८१७ संजय दिगांबर रांजणे, ने. पो. स्टे. मांडवी** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे.मांडवी** गुरन ५६/२०१८ कलम ६५ (ई), महाराष्ट्र प्रो.कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१६७१ चव्हाण, मो.क्र. ०२४६०-२६६२७०** हे करीत आहेत.

## ९)विषारी औषध पिऊन आत्महत्या :-

**मुक्रामाबाद :-** दिनांक १२.०८.२०१८ रोजी चे १७.०० वा. चे सुमारास स. द. मुखेड जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे पुंडलीक हाणमंत बुटापल्ले, वय ३० वर्षे व्यवसाय शेती रा. थोटवाडी ता. मुखेड जि.नांदेड** हा अज्ञात कारणावरुन कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार पोना/२०४९ सि. व्ही. आंबेवाड पो. स्टे. मुखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुक्रामाबाद** आ.मृ. नं. १०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १८८३ केंद्रे , मो.क्र. ९७६४४१५९३४** हे करीत आहेत.


**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक १५/०८/२०१८**

## " तंबाखु विरोधी शपथ "

मा. आयुक्त, (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई, व मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांचे पत्रकान्वये १५ ऑगष्ट, स्वातंत्र्यदिनानिमित्त तंबाखु मुक्त शपथ घेणे बाबत सुचना केल्या नुसार, **मा. संजय जाधव**, पोलीस अधिक्षक, नांदेड यांचे हस्ते १५ ऑगष्ट, स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रीय ध्वज फडकवल्यानंतर ध्वजाला सलामी देवुन बँडपथकाने राष्ट्रगीताची धुन वाजवली. त्यानंतर "तंबाखु विरोधी शपथ" घेण्यात आली. **मा. ए. जी. खान,** पोलीस उप अधिक्षक (मु), यांनी सदर शपथेचे वाचन केले. त्यांचे पाठोपाठ सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी शपथ घेतली. तंबाखु, जर्दा, खर्रा आणि धुम्रपान ह्यांच्या दुष्परिणांमांची जाणीव करुन देवुन जन्मभर ह्यां व्यसनांपासुन दुर राहाण्याचा संकल्प करावा, तसेच कार्यालय, घर, परिसर तंबाखुमुक्त रहावा, इतरांनी तंबाखुजन्य पदार्थाचा परित्याग करावा, भारत सरकारचा तंबाखु नियंत्रण कायदा २००३ ची प्रभावी अमंलबजावणी व्हावी व तंबाखुमुक्त जिवन जगण्याचा सल्ला दिला. या प्रसंगी **मा. अक्षय शिंदे**, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, मा. अभिजित फस्के, उपविपोअधिकारी नांदेड शहर, मा. धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा, तसेचे स्थानिक गुन्हे शाखा, जिवीशा, नियंत्रण कक्ष, पो. मु. येथील पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच कार्यालयीन कर्मचारी व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठया संख्येने हजर होते.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.